फोन : ०२०-२९५१६२६४

# ॲग्रोमेटॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

## कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५

ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०२/०६/२०२६

## जिल्हा : पुणे

| मागील आठवड्यातील हवामान (२७/०५/२०२६ ते ०२/०६/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०२/०६/२०२६ ते ०६/०६/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | 1 | 2 | दिनांक | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 9.0 | 8.0 | 7.0 | 5.0 | 4.0 |
| 36.8 | 37.5 | 39.0 | 37.6 | 36.9 | 37.0 | 38.1 | कमाल तापमान (अं.सें.) | 37 | 38 | 38 | 39 | 39 |
| 25.0 | 24.8 | 24.9 | 25.8 | 25.7 | 24.6 | 25.3 | किमान तापमान (अं.सें.) | 24 | 25 | 25 | 25 | 26 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 76 | 73 | 69 | 72 | 68 | 73 | 74 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 78 | 78 | 80 | 81 | 81 |
| 37 | 33 | 37 | 38 | 39 | 34 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 44 | 47 | 51 | 56 | 55 |
| 8.6 | 8.8 | 9.5 | 9.4 | 8.3 | 8.3 | 7.4 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 11 | 12 | 13 | 12 | 11 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 281 | 272 | 265 | 260 | 265 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०२ ते ०६ जून, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ दिनांक ०२, ०३ व ०५ जून, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ------ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा --- राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी --- राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी पेक्षा --- राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पूर्वमोसमी पावसाची शक्यता असल्याने पक्व झाले ल्या पिकांची, फळे व भाजीपाल्याची काढणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी तसेच पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरित्या झाकून ठेवावीत.<br>• पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशकाची व बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो पावसाची उघडीप बघून करावी.<br>• खरीप हंगामासाठी पूर्व मशागतीच्या कामाची तयारी करावी. जमिनीची खोली लक्षात घेऊन त्याप्रमाणे पिकांचे नियोजन केल्यास अवर्षणवर्षी उत्पादनात स्थिरता आणण्यास मदत होईल. उपलब्ध जमिनीनुसार पिक व वाणांची निवड करावी. एक नांगरट, दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभूशीत करावी व शेवटच्या कुळवणी अगोदर अवशक्तेनुसार व उपलब्धतेनुसार कंपोस्ट / शेणखत शेतात मिसळावे.<br>• पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास , विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक, बुरशीनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी. कोणत्याही पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• विहीर पुनर्भरण व कूपनलिका पूनर्भर णासाठी योग्य उपाय योजना कराव्यात. पाणलोट क्षेत्रात योग्य ठिकाणी शेततळी खोदून वाहून जाणारे पाणी शेततळयात साठवावे. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोड किडी च्या जैविक नियंत्र णासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| मका | काढणी ते साठवणूक | अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच |

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट किवा ओलसर जागेत करू नये. |
| हुमणी कीड | किडीचे नियंत्रण | हुमणीपासून पिकाचे नुकसान होऊ नये यासाठी हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ , बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा. मातीतील ओलावा टिकविण्यासाठी व बाष्पीभवन रोकण्यासाठी अच्छादन (मल्चिंग) करणे फायदेशीर ठरेल. नवीन लागवड मृग बाग (जून लागवड) साठी शेत तयार करावे. लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. |
| द्राक्ष | छाटणी पश्चात | छाटणीनंतर १ टक्के बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. बागेस पाण्याचा संतुलित वापर/पुरवठा करावा. बागेत सेंद्रिय आच्छादनाचा वापर करावा व शिफारशीत मात्रेनुसार संजीवकाचा वापर करावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या फुले अमृतकाळ (Phule Amrutkal App) या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) ॲपच्याद्वारे माहिती मिळवावी. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.** | | |

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : ०२.०६.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**